## "यांचेशिवाय नमस्कार तो कोणाला करायचा"

# कविता-कामिनी-कान्त : भास्कर रामचंद्र तांबे

जन्म - मुगावळी, मूळगांव - खेडकुळी, ता. व जि. रत्नागिरी - २७.११.१८७४

मृत्यू - ग्वाल्हेर - ०७.१२.१९४१

राजकवी श्री. तांबे आठवले की, हमखास मला 'काव्यमीमांसा' या ग्रंथाचा विचक्षण रचयिता 'राजशेखर' आठवतो. काव्याबद्दल एक महत्त्वाचे सार्वकालिक सत्य तो सांगून ठेवतोय.... "काही कवींची काव्ये त्यांच्या घराच्या चार भिंतींमध्येच फिरत राहतात. काहींचं काव्य त्यांच्या मित्रांच्या घरापर्यंत पोहोचतं. पण एखादाच कवी असा असतो; की त्याचे काव्य विदग्ध, सहृदयोत्तम, रसिकवरांच्या मुखांवर - पदन्यास करीत आपली विश्वभ्रमणाची अभिलाषा जणू पूर्ण करून घेते.

कविता-कामिनीचा प्रियकर भास्कर रामचंद्र तांबे यांच्या किती-किती-किती कविता, त्यांना जाऊन आता सत्तर वर्षे होत आली; तरी अनेक रसिकांच्या मुखात सतत रुणझुणत असतात. निर्मळ मनाच्या गायकाला त्यांची कविता गायल्याशिवाय चैन पडणार नाहीच; पण न गाणाऱ्या लोकांच्या तोंडातही तांबे यांच्या कविता आपला पदन्यास करीतच असतात. दुष्टतेचं हिडीस व्रत घतलेल्या 'पैशुन्यव्रती' लोकांना त्यामुळे तीव्र पोटशूळ होतो, ही गोष्ट वेगळी !

त्यांची कोणतीही कविता जऽऽऽराशी आठवा, मग ती, 'भाग्य उजळले तुझेऽऽऽऽ चरण पाहिले', 'क्षणभर उघड नयन देवा', 'चरणी तुझिया मज देई वास हरी'.... सारखी भक्तिगीते असोत, रुणुझुणु ये रुणुझुणु ये झणकारित बाऽऽऽळा' सारखे एखाद्या घरातल्या बाळकृष्णावर केलेले काव्य असो; का 'ते दूध तुझ्या त्या घटातले' सारखं विचारप्रवर्तक गीत असो, 'नववधू प्रिया मी बावरते' सारखे अल्लड, नवख्या मुलीचं रूपचित्रण असो किंवा 'तिन्हीसांजा सखेऽऽऽ मिळाल्या' सारखं स्वरूप-चित्रण असो, 'क्षणोक्षणी पडे उठे' सारखी एखाद्या पक्षिणी-मातेची व्यथा असो; की 'मधु मागसि माझ्या सख्यापरि'... सारखं गाणं म्हणून - 'जन पळभर म्हणतील हाय हाय'... असे मरणोत्तर वास्तवाचे चित्रण असो. प्रत्येक गाण्यामध्ये काव्यातून जाणवणारी गेयता, सृजनता, कोमल भावनांचे संमेलन, जीवनाचे वास्तव, नादानुसंधाची शब्दांचीच नव्हे, शब्दांतल्या वर्णांची ही संरचना, नवविचार; जो पूर्वी कोणाही व्यक्तीने चघळला नाही. ओजस्विता, प्रसन्नता, माधुर्य ... हे सगळे काव्यगुण त्यांची रसवत्ता घेऊन थबथबलेले आहेत; हीच जाणीव राहते.

मराठी कवितेचे नावीन्य किंवा आधुनिकता मापण्याचे घटक असे हवे होते - सर्वथा नवीन कल्पनांचे चित्रीकरण किती जास्त प्रमाणात ? देश-काळाच्या मर्यादा ओलांडणाऱ्या भावभावनांचे संमेलन कसे आहे ? भावभावना, चित्रमयता, कल्पनांतील लाजबाब सौंदर्य, अद्‌भुतता व चमत्कृती यांचे अनोखे मिश्रण, शब्द व अर्थगत सौंदर्य, परसंवेदनांची अत्युत्कृष्ट ताकद, काव्याचा टिकाऊ गुणधर्म, कवी गेल्यावरही त्याच्या पश्चात किती वर्षे त्याची लोकप्रियता राहिली ? या सर्व गुणवत्ता तांबे कवींची अशा प्रकारचा या गुणवत्ता असलेला पहिला आधुनिक कवी अशीच नोंद सहृदय साहित्यिक करतात - खासगीत बोलतात. मनावर या सर्व काव्य-विचारांचा एक अमिट ठसा उमटतो. हा असा आधुनिक काळातला पहिला मराठी कवी; की, ज्याचे काव्यात प्रकट झालेले विचार, गेय स्वरूपात मनाच्या मखमली पेटीत अनेक रसिकवरांनी आपाआप जपून ठेवले आहेत. ज्यांची आठवण झाल्याबरोबर अमंगल, अशिव, केवळ दुर्जनांनी कवटाळण्याचे नव्हे, कोणतेही विचार आपणाजवळ रहाणार नाहीत. अनेकांच्या डोळ्यांमध्ये अश्रू दाटत रहातात.

कविश्रेष्ठ तांबे यांचे आजोबा पं. गंगाधरशास्त्री तांबे यांनी संस्कृत व्याकरण, काव्यशास्त्र, वेदान्त-विद्या आणि आयुर्वेद या शास्त्रांमध्ये पांडित्य संपादन केलेले होते. व्यवसायाने ते आयुर्वेद-वैद्य होते. कविवर्य श्री. तांबे यांना तीन भाऊ आणि दोन बहिणी होत्या. झांशी येथे त्यांचे प्राथमिक शिक्षण झाले आणि माध्यमिक शिक्षण देवासला झाले. मॅट्रिकला फर्स्टक्लास मिळूनही वडील भाऊ इंदूरला बी.ए.ला असल्यामुळे व दोघांचा कॉलेज शिक्षणाचा खर्च झेपणार नसल्यामुळे आत्यंतिक इच्छा असूनही त्यांना कॉलेजचे शिक्षण घेणे हा विचार मोठ्या खेदाने सोडावा लागला.

शिक्षक म्हणून देवासला नोकरी सुरू केली. १८९४ मध्ये देवासचे राजपुत्र खासेराव पवार यांचे शिक्षक म्हणून नोकरी केली. त्यांचा विवाह १८९६ साली रतलाम इथल्या त्र्यंबकराव जावडेकरांची कन्या वारूबाई यांचेशी झाला. विवाहानंतर त्यांचे नाव 'पार्वती' असे झाले.

उच्च शिक्षणासाठी खासेराव पवार इंदूरला गेल्यावर त्यांचे पालक म्हणून १९०० साली तांबे इंदूरला आले. त्याचवेळी धार संस्थानच्या इंदूर येथील कोठीची व्यवस्थाही ते पहात.

याचवेळी विष्णु मोरेश्वर महाजनी; या, त्याकाळच्या मोठ्या साहित्यिकाशी त्यांची अमरावती येथे ओळख झाली. १९०३ साली इंदूर येथेच देवासची वकील म्हणून काम पाहिले. १९०८ साली इंदूरची नोकरी सुटली व इंदूरजवळच गुदरखेडा येथे नोकरी मिळाली. १९११ साली पिलोदा येथे एका बड्या जहागिरदाराचे दिवाण म्हणून काम पाहू लागले. १९१५ साली प्रतापगड येथे ते सुपरिंटेंडेंट ऑफ पोलीस म्हणून काम पाहू लागले. नंतर तिथेच त्यांची फर्स्ट मॅटिस्ट्रेट म्हणून नेमणूक झाली. १९२६ साली ग्वाल्हेर संस्थानमध्ये शिक्षण खात्यामध्ये रजिस्ट्रार ऑफ एक्झामिनेशन्स् म्हणून नोकरी मिळाली.

१९२७ मध्ये मध्यभारत कविसंमेलनाचे ते अध्यक्ष होते. १९३२ मध्ये कोल्हापूरला झालेल्या साहित्य संमेलनांतर्गत कविसंमेलनाचे अध्यक्षपदी ते होते. १९३५ साली ''तांबे - व्यक्तिमत्त्व व कला'' हा ग्रंथ ग्वाल्हेरच्या वाढदिवस मंडळाने त्यांचेवर केला. १९३६ मध्ये कवी माधवराव पटवर्धनांनी त्यांच्या कविता संपादन केल्या. १९३७ साली ते सेवानिवृत्त झाले. या सेवानिवृत्तीपूर्वी ग्वाल्हेरच्या राजांनी त्यांना 'राजकवी' ही पदवी व शंभर रुपयांची मासिक नेमणूक करून दिली होती.

तांबे यांच्या कविता १८९१ पासून जोशात प्रसिद्धी पावत होत्या. माधवराव पटवर्धनांनी तांबे यांच्या काव्यामध्ये रवींद्रनाथांच्या काव्यातले साम्य दिसतेय हा जो छुपा आरोप होत होता तो खोडून काढलाय. रवींद्रनाथांचे 'गार्डनर' १९१३ साली प्रसिद्ध झाले; म्हणजे रवींद्रनाथांच्या खूप आधी वीस-बावीस वर्षे कवी म्हणून श्री. तांबे उदयाला येऊन गार्डनर् प्रसिद्ध होईपर्यंत स्थिरपद झाले होते. तांबे यांच्या काव्यावर अलोट प्रेम करणारे प्रो. वा. गो. मायदेव आणि माधवराव पटवर्धन या दोघांनीही तांबे यांच्यावर निखालस अन्याय करणाऱ्या या विधानांची खरमरीत हजेरी घेतली आहे.

हे सर्व माहीत असूनही, यानंतर अठरा वर्षांनी पटवर्धन व मायदेव यांच्या प्रतिपादनाकडे पूर्ण दुर्लक्ष करून तांबे यांना काळ्या ढगात लपेटण्याचे मोठे काम रा. श्री. जोगांनी केले.

'कै. तांबे यांची समग्र कविता', पुण्याच्या व्हीनस प्रकाशनाने प्रसिद्ध केली. ते साल होते १९५३. तांबे कुटुंबीयानी आणि प्रकाशक पाध्ये यांनी सातवळेकरांच्यासारखाच भोळा स्वभाव त्यांचाही असल्याचे सिद्ध केले ते, रा. श्री. जोग यांना त्या समग्र कविता संग्रहाला प्रस्तावना लिहायला सांगून; आणि जोगांनी पु. ल. देशपांडे यांनी वर्णन केलेला अस्सल पुणेरी त्यांच्या रूपात दाखविला. त्यांची एकेक वाक्ये पहा -

i) आधुनिक कवींत तांब्यांइतका भाग्यवान कवी दुसरा कोणी झाला नाही. (याचा अर्थ त्यांची प्रसिद्धी

त्यांना भाग्यामुळे म्हणजे नशिबाने मिळाली. ते काही खरे कवी नव्हते.) रा. श्री. जोगांसह सर्वांनाच त्यांच्या त्यांच्या भाग्याने ती ती गोष्ट मिळते हे खरेच आहे.

ii) पण लगेच पुढच्याच पॅरेग्राफची सुरुवात पहा - 'तांब्यांच्या यशात केवळ भाग्याचा भाग होता असे समजणे मात्र चुकीचे होईल' असेही मोठ्या उदारपणे सर्टिफिकेट देऊन आपला तोल सावरण्याचा प्रयत्न केल्याचे दाखविले.

iii) अतिशय निगूढ टीकात्मक पोटशुळाचे प्रदर्शन करणारी प्रस्तावना लिहून शेवटी फारच उदार मनाने 'तांब्यांची कविता काव्य आहे' असे प्रशस्तिपत्र दिले आहे. (तांबे यांची समग्र कविता - प्रकाशक - व्हीनस प्रकाशन, पुणे, नववी आवृत्ती - सप्टेंबर १९९५)

iv) या प्रस्तावनेतले एक भयंकर वाक्य पहा - 'स्वतः तांबे यांनाही 'मधुघट रिकामे' पडत असल्यासारखे वाटू लागले होते.' कालिदासाच्या रघुवंशामध्ये कालिदासाने मोठ्या विनयशीलतेने 'मी मंद बुद्धीचा आणि मोठ्या कवींच्या कीर्तीची इच्छा करतोय' असे लिहिले आहे. यावर एखाद्याने लिहावे की पहा कालिदासच म्हणाला 'मी मंद बुद्धीचा आहे' ...तसेच हे वाक्य आहे.

कविवर्य तांबे यांनी कोणत्या भावनेने ही कविता लिहिली आणि फर्ग्यूसन कॉलेजचे भूतपूर्व मराठी विभाग प्रमुख ख्यातनाम प्राध्यापक त्याचा अर्थ काय देतात, त्याचा हेतू काय हे लगेच लक्षात येईल.

v) मला असे वाटते की तांबे यांच्या कवितेचा आधार घेऊन असे लिहिणाऱ्या जोगांना तांबे यांना अजूनही खाली ओढता आले असते ते या ठिकाणी - उदा. ''भास्कर करिशी काजव्या तुझ्या दयेस न पार''. हे उदाहरण देऊन 'त्यांच्याच काव्यात त्यांनी कबूल केले अहो की आपण प्रसिद्धी मिळविण्या-लायक नव्हतो मला प्रसिद्धी नशिबाने मिळाली ! खरं तर मी 'काजवा'च होतो हे त्यांनीच त्यांच्या काव्यात म्हटले आहे ... पण हे असेच जोगांनी म्हटलं नाही हे त्यांचे उपकार, तांबे भक्तांनी स्मरायला हवेत. याच पद्धतीने जोगांनी तुकाराम-ज्ञानेश्वर-एकनाथ यांचेवर लिहिलं असतं तर ? पण हे असं कोणाबाबत लिहिणं फायद्याचे ठरेल हे ते जाणत होते. हे असं लिहिल्याबद्दल खासगीमध्ये त्यांचं किती कौतुक झालं असेल ?

vi) कवीश्री माधवराव पटवर्धन, प्रो. वा. गो. मायदेव यांच्यासारख्या मर्मज्ञ, सहृदय तत्त्वचिंतकांनी अभ्यासपूर्वक श्री. तांबे यांची कविता रवींद्रनाथांच्या कवितांच्या सतरा-अठरा वर्षे आधीच प्रसिद्ध झालेली होती, हे दाखवून दिलेले असूनही आणि त्यांचे पुस्तक खूप वर्षे आधी प्रसिद्ध झालेले असूनही रा. श्री. जोग लिहिते झाले - 'हा वाङ्मय चौर्याचा प्रकार नसून रवींद्रनाथांच्या काव्यवाचनाच्या परिणामाचा हातभार आहे' असे खासे विधान केले आहे. गोबेल्स प्रचाराचा अस्सल नमुना !

ही जोगांची पद्धत शिकून घेतली तर स्लेजिंगचा उत्कृष्ट नमुना, दुसऱ्या, गुणांनी श्रेष्ठ असलेल्या व्यक्तीचा असणे त्याच तशाच व्यक्तींना मानसिक दृष्ट्या खच्ची करण्याची रक्तात मुरलेली विद्या किती बीभत्स, ओंगळ, किळसवाणी असू शकते याचे उत्तम प्रदर्शन आहे हे दाखवता येईल!

अशा दुष्टाव्याला पुरून उरणारी गुणवत्ता सतत जपत आणि मशागत करीत आलेल्या या समाजातल्या सर्व थरातील गुणश्रेष्ठ व्यक्तींना नमस्कार नाही करायचा तर तो कोणाला करायचा ? पुढच्या पिढ्यांमध्ये लघाटे, आंबेकरांसारख्यांनी या गुणवत्ता जोपासलेल्या दिसतात. त्यांनाही खाली ओढणाऱ्यांनी, परंपरा सोडलेली नाही !!

१) याकरिता मुद्दाम वाचा -
www.thekarhaadaa.org

२) या पुढच्या आवृत्तीत आपण वाचू अलोक सामान्य साहित्यिक श्री. विष्णू सखाराम खांडेकर.

**अवधूत हर्डीकर**
१६ ए, गणेशकृपा सोसायटी,
परमहंसनगर, पौड रोड,
पुणे ४११ ०३८९